# भारती विद्यापीठ मध्यवर्ती कार्यालय, पुणे

दिनांक : १९/०८/२०२१

जा.क्र. : भा.वि /म.का./ ६९८७ /२०२१-२०२२

परिपत्रक महत्वाचे

प्रति,
प्राचार्य /संचालक/विभागप्रमुख
भारती विद्यापीठ
भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय

---

---

Bharati Vidyapeeth (Deemed to Be University)
Inward No.: 897
Date: 20/08/2021
Sign.:
* Dental College & Hospital *

मला प्राप्त झालेल्या आदेशानुसार भारती विद्यापीठ व भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयांतर्गत येणाऱ्या शाखांचे /विभागांचे सर्व शाखाप्रमुख /विभागप्रमुख यांना कळविण्यात येते की,-

संस्थेच्या विविध शाखा/ विभागातील शाखाप्रमुख / विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी हे शाखेच्या /विभागाच्या प्रशासकीय / शैक्षणिक कामकाजाच्या तसेच संबंधित वैयक्तिक कामाच्या अनुषंगाने संस्थेच्या तसेच विश्वविद्यालयाच्या मुख्य कार्यालयात येत असतात. त्या दृष्टीने शाखाप्रमुखांना, महाविद्यालयाच्या विविध प्रशासकीय कामाच्या दृष्टीने, तसेच वर्तमान आणि नियोजित शैक्षणिक उपक्रमांसंदर्भात, त्याचप्रमाणे परिस्थितीनुरुप निर्माण झालेल्या व संभाव्य येऊ घातलेल्या समस्यांचे निराकरण करण्याकरिता मदत/मार्गदर्शन/सूचना/आदेश हवे असेल तर त्याकरिता मध्यवर्ती कार्यालयात व विश्वविद्यालयाच्या मुख्य कार्यालयात सर्व पदाधिकारी /अधिकारी वर्ग कार्यालयीन वेळेत पूर्णवेळ उपलब्ध असतील. जर या कामांकरिता मा.कार्यवाह/मा.प्रकुलगुरु यांची समक्ष भेट घ्यावयाची असेल आणि त्यांचेकडून मार्गदर्शन /आदेश हवे असतील तर त्याकरिता मा. कार्यवाह /मा. प्रकुलगुरु यांचे मध्यवर्ती कार्यालयातील स्वीय सहाय्यक श्री विनय बालगर, ( मोबा. ९८८११७०१४३) यांचेशी संपर्क साधून, पूर्वपरवानगीने, मा. कार्यवाह/मा.प्रकुलगुरु मध्यवर्ती कार्यालयात ज्या दिवशी उपस्थित असतील त्या दिवशी सर्व शाखाप्रमुखांना, ते कार्यालयीन वेळेत उपलब्ध होतील.

तसेच प्राध्यापक, शिक्षक सेवक यांना, त्यांच्या शैक्षणिक व प्रशासनाच्या कामकाजाच्या निमित्ताने अथवा त्यांच्या वैयक्तिक कामाच्या (बढती/बदली) अनुषंगाने मध्यवर्ती कार्यालयात व विश्वविद्यालयाच्या मुख्य कार्यालयात सर्व पदाधिकारी /अधिकारी वर्ग फक्त दुपारी २.३० ते ४:३० या वेळेत उपलब्ध असतील. जर त्यांच्या कामाच्या दृष्टीने त्यांना मा.कार्यवाह/मा.प्रकुलगुरु यांनाच भेटावयाचे असेल तर त्यांनी मा. कार्यवाह/ मा.प्रकुलगुरु यांचे मध्यवर्ती कार्यालयातील स्वीय सहाय्यक श्री विनय बालगर,(मोबा. ९८८११७०१४३) यांचेशी संपर्क साधून

पूर्वपरवानगीने मा. कार्यवाह/मा.प्रकुलगुरु मध्यवर्ती कार्यालयात ज्या दिवशी उपस्थित असतील त्या दिवशी फक्त दुपारी २.30 ते ४.30 या वेळेतच त्यांना मा. कार्यवाह यांची भेट मिळू शकेल.

त्याचप्रमाणे सर्व शिक्षकेतर सेवकांना प्रशासकीय ( वेतन देयक तसेच अन्य तत्सम देयकांच्या धनादेशावर स्वाक्षऱ्या घेणे अथवा अन्य ), आणि त्यांच्या वैयक्तिक कामाच्या अनुषंगाने ( बदली /बढती वा अन्य) मार्गदर्शन /सूचना /माहिती मिळणेकरिता मध्यवर्ती कार्यालयात व विश्वविद्यालयाच्या मुख्य कार्यालयात सर्व पदाधिकारी /अधिकारी वर्ग फक्त दुपारी ४.30 ते ५.30 या वेळेत उपलब्ध होऊ शकतील. जर त्यांच्या या कामाच्या दृष्टीने त्यांना मा.कार्यवाह/मा.प्रकुलगुरु यांनाच भेटावयाचे असेल तर त्यांनी मा. कार्यवाह/ मा.प्रकुलगुरु यांचे मध्यवर्ती कार्यालयातील स्वीय सहाय्यक श्री विनय बालगर.(मोबा. ९८८११७०१४3) यांचेशी संपर्क साधून, पूर्वपरवानगीने मा. कार्यवाह/मा.प्रकुलगुरु मध्यवर्ती कार्यालयात ज्या दिवशी उपस्थित असतील त्या दिवशी फक्त दुपारी ४.30 ते ५.30 या वेळेतच त्यांना मा. कार्यवाह यांना भेटता येईल.

सर्व शाखाप्रमुखांनी /विभागप्रमुखांनी या परिपत्रकाची कटाक्षाने नोंद घ्यावी आणि या परिपत्रकातील मजकूर त्यांच्या शाखेतील सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर सेवकांच्या निदर्शनास आणून द्यावा, या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करावी.

( डॉ. के. डी. जाधव )
सहकार्यवाह (प्रशासन)
भारती विद्यापीठ, पुणे